## भारतभू



नितांत सुंदर, निर्मळ प्रेमळ,
भारतभू चे रूप साजिरे
भाग्य आपुले, नवल पहाता
वर्णन करण्या शब्द अपुरे ॥

हिम-आच्छादित स्वर्गीय लेणे
सालंकृत भासे लडिवाळी
दाल लेक अन शाही बागा
रूप गर्विता मिरवीते भाळीं ॥

सुहास्य विलसे, ताजमहाली
इतिहासाची मूर्त निशाणी
लाल किल्ला रंगवून सांगे
स्वातंत्र्याची वीर कहाणी ॥

लढवय्ये रण, प्रताप स्फुरतो,
हळदी-घाटी, चेतक स्मरतो
खगोल-विद्या, गौरव चिन्हे
जंतर-मंतर जगा सांगतो ||

सश्रद्धेची गंगा वाहणारी
पायी शोभती भव्य गोपुरे
बद्री-केदार अन जग्गनाथ पुरी
भक्ती, संस्कृती असंख्य मंदिरे ॥

अद्भुत कोरीव, दैवी कलात्मक
अजंठा अन वेरूळ लेणी
महाराष्ट्राची शान वेगळी

जिवंतपणाची खूण पाषाणी ॥

उदात्त, प्राचीन, संयत-ज्ञानी
अशी देखणी, राजस राणी
भारत भू ला किती वर्णावी ?
जगात नाही दुसरी कोणी

**- संध्या रानडे**